मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# व्यावसायिक इमारतींचे करा 'स्ट्रक्चरल ऑडिट'

## आयुक्त शेखर सिंह यांच्या हॉटेल व्यावसायिकांना सूचना : अग्निसुरक्षा प्रमाणपत्र,विद्युत सुरक्षा ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिका हद्दीतील हॉटेल व्यावसायिकांनी एका महिन्याच्या आत व्यवसाय इमारतीचे 'स्ट्रक्चरल ऑडिट' करावे. तसेच महापालिकेकडून व्यवसाय अग्निसुरक्षा प्रमाणपत्र आणि विद्युत सुरक्षा ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे, अशा सूचना आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी हॉटेल व्यावसायिकांना दिल्या. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनातील आयुक्त यांच्या दालनात हॉटेल व्यावसायिक संघटनांसमवेत बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी आयुक्त शेखर सिंह होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शहर अभियंता मकरंद निकम, उप आयुक्त मनोज लोणकर, संदीप खोत, अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता हरविंदर सिंग बन्सल, अग्निशमन अधिकारी ऋषिकेश चिपाडे यांच्यासह विविध हॉटेल संघटनाचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी हॉटेल्स च्या ठीकाणी करावयाच्या अग्निशामक यंत्रणेविषयी सविस्तर माहिती उप आयुक्त मनोज लोणकर यांनी दिली.



### महापालिकेकडून ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे

» शहरात सर्वत्र हॉटेल, रेस्टॉरंट, बार आणि इतर व्यावसायिक इमारतींची संख्या मोठी आहे. याठिकाणी मोठ्या प्रमाणात नागरिक वावरत असतात. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शहरातील सर्व हॉटेल्स, बार, रेस्टॉरंट तसेच इतर व्यावसायिक इमारतींचे संबंधित व्यवसाय मालकांनी एका महिन्याच्या आत 'स्ट्रक्चरल ऑडिट' करून घ्यावे. तसेच महापालिकेकडून व्यवसाय अग्निसुरक्षा प्रमाणपत्र, विद्युत सुरक्षा ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे, असे आयुक्त शेखर सिंह म्हणाले.

### हॉटेल वेस्टपासून सीएनजी

» महापालिकेच्या वतीने येत्या काही दिवसात शहरातील सर्व हॉटेल्स, बार, रेस्टॉरंट, हॉस्पिटल तसेच व्यावसायिक इमारतींचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. सर्वेक्षणात दोषी आढळलेल्या आस्थापनांवर महापालिकेच्या वतीने कठोर कारवाई करण्यात येणार आहे, तसेच हॉटेल्स, बार, रेस्टॉरंट येथे बेकायदेशीर व्यवसाय चालू असल्यास त्यांच्या सर्व परवानग्या रद्द करण्यात येतील, असेही आयुक्त म्हणाले.

### महापालिकेच्या वतीने कठोर कारवाई

» ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून सीएनजी गॅस निर्मिती करणारा प्रकल्प महापालिकेने मोशी येथे उभारला आहे. त्यासाठी हॉटेल्स, मंगल कार्यालये, रेस्टॉरंट, खानावळ, कॅन्टिन चालकांनी १०० टक्के ओला कचरा विलगीकरण करून ओला कचरा संकलित करणाऱ्या विशेष वाहनातच टाकावा, असे आवाहन आयुक्त सिंह यांनी केले आहे. क्षेत्रीय कार्यालय स्तरावर ओला कचरा संकलनसाठी विशेष वाहन पाठविण्यात येत आहे. टप्प्याटप्प्याने हॉटेल वेस्ट वाढवून दररोज ५० टन हॉटेल वेस्टवर प्रक्रिया करून दोन हजार किलो सीएनजी तयार करण्याचे उद्दिष्ट आहे. शिल्लक राहिलेल्या लगद्यापासून लिक्विड फर्टिलायझर तयार केले जाईल, असेही आयुक्त यांनी सांगितले.

# पूजा खेडकर कुटुंबियांची थर्मोव्हेरिटा प्रा. लि कंपनी सील

## दोन वर्षांचा कर थकवला, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाने केली कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

विवादित आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांच्या कुटुंबाला आणखी धक्का बसला आहे. तळवडे येथील खेडकर कुटुंबाशी संबंधित असलेल्या थर्मोव्हेरिटा प्रायव्हटे लिमिटेड कंपनीला महापालिकेने सील केले आहे. थर्मोव्हेरिटा प्रायव्हटे लिमिटेड कंपनीने महापालिकेचा मालमत्ता कर थकविल्याने कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने शुक्रवारी (दि. १९) सील ठोकले आहे. या कंपनी संचालकाकडे महापालिकेचा दोन लाख ७७ हजार रूपयांची कराची थकबाकी आहे.

तळवडे गावठाण, ज्योतिबानगर येथे थर्मोव्हेरिटा प्रायव्हटे लिमिटेड ही कंपनी आहे. भारतीय प्रशासकीय सेवेतील (आयएएस) प्रशिक्षणार्थी अधिकारी पूजा खेडकर यांच्या कुटुंबाशी निगडीत आहे. त्यामुळे कंपनी वादाच्या भोव-यात अडकली आहे. कंपनी म. दि. खेडकर यांच्या नावे आहे. महापालिकेने यासंदर्भातील सर्व कागदपत्रे तपासली आहेत.

कंपनीमार्फत २००९ पासून व्यावसायिक कर भरला जात होता. शेवटचा कर २०२२ मध्ये भरण्यात आला. त्यानंतर कर भरला नाही. कंपनीने दोन लाख ७७ हजार ७८१ रूपयांचा कर थकविला आहे. त्यामुळे नियमानुसार मालमत्ता जप्त करण्याची कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने करण्यात आली. कारवाईवेळी प्रशासन अधिकारी नाना मोरे, एल. एम काळे संबंधित गटलिपिक, एमएसएफ जवान उपस्थित होते.



### थर्मोव्हेरिटा कंपनीचा तब्बल 2 लाख 77 हजारांचा कर थकीत

» पिंपरी पालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे एबीपी माझाशी बोलताना सांगितलं, "रेकॉर्ड तपासल्यानंतर असं दिसून आलं की, 2009 पासून कर भरला जात होता, शेवटचा कर 2022 मध्ये भरण्यात आला होता. आतापर्यंतचा थकीत कर पाहिला तर तब्बल 2 लाख 77 हजारांचा थकीत कर आहे..

### कंपनीचा भाग रेड झोनमध्ये

» "कंपनी ज्या भागात येते, तो भाग रेड झोनमध्ये येतो, त्यामुळे त्या भागातील सर्व कंपन्या अनधिकृत आहेत. त्यामुळे या कंपनीवर कारवाई केली जाईल. नियमांनुसार, अनधिकृत इमारत असेल, तर संबंधित मालकांना एक महिन्यांची नोटीस दिली जाते. त्यानंतर जी काही योग्य कारवाई असले, ती त्यांच्यावर केली जाते.", असं पिंपरी पालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे यांनी सांगितलं आहे.

# आकुर्डीत एकाच घरातील 5 जणांना डेंग्यूची लागण

## डेंग्यूचा फैलाव रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची दिवंगत नगरसेवक जावेद शेख स्मृती प्रतिष्ठानची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

आकुर्डीत एकाच घरात डेंग्यूचे ५ रुग्ण आढळले असून परिसरात चिंतेचे वातावरण पसरले आहे. वाढत्या डेंग्यूच्या फैलावाला आवर घालण्यासाठी तातडीने कडक उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणी दिवंगत नगरसेवक जावेद शेख स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आली आहे.

आकुर्डी येथील विवेकनगरमध्ये एका अपार्टमेंट मधील एकाच कुटुंबातील ५ व्यक्तींना डेंग्यूची लग्न झाली आहे. या सर्व रुग्णांना खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. आकुर्डी भागात डेंग्यूची साथ वाढण्यापूर्वी तातडीने कडक उपाययोजना करण्याची मागणी दिवंगत नगरसेवक जावेद शेख स्मृती प्रतिष्ठानचे इखलास सय्यद आणि तौहिद जावेद शेख यांनी 'अ' क्षेत्रीय कार्यालयाच्या क्षेत्रीय अधिकारी सुचेता पानसरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

आकुर्डीत ज्या ठिकाणी रुग्ण सापडले आहेत, त्या ठिकाणी औषध फवारणी, धूर फवारणी करावी. आजूबाजूच्या परिसरात कडक कंटेनर सर्व्हे करावा. तसेच संपूर्ण आकुर्डी भागात कंटेनर सर्व्हे राबवून डेंग्यूचे डास उत्पत्ती स्थळे शोधावीत आणि डेंग्यूचा प्रसार होणार नाही याची काळजी घ्यावी असे या निवेदनात नमूद केले आहे. दरम्यान एकाच कुटुंबात डेंग्यूचे पाच रुग्ण आढळल्यामुळे परिसरात चिंतेचे वातावरण पसरले आहे.

त्या रूग्णांचा अद्याप डेंग्यूचा चाचणी अहवाल प्राप्त झालेला नाही. ते रुग्ण सद्यस्थितीत डेंग्यू संशयित असून, त्यांची प्रकृती स्थिर आहे, असे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी सांगितले.




### साचलेल्या पाण्यात डासांची पैदास

» रूग्ण आढळून आलेल्या सोसायटीच्या गच्चीवर पावसाचे पाणी साचले होते. त्यात डेंग्यूच्या अळ्या आढळून आल्या आहेत, असे सोसायटीतील रहिवाशांना सांगितले. एकाच घरातील पाच जणांना डेंगी लागण झाली आहे. सत्तर वर्षांचे दोन ज्येष्ठ नागरिक आहेत. 25 ते 30 वर्षे वयोगटांचे तीन जण आहेत. त्यातील तिघे जण गेल्या तीन दिवसांपासून रूग्णालयात दाखल आहेत. तर, दोघे घरीच उपचार घेत आहेत. घरातील बहुतेकांना डेंग्यूची लक्षण दिसत असल्याने लहान मुलांना आजार होईल म्हणून आम्ही पालिकेकडे तक्रार केली. महापालिकेने घरोघरी तसेच, आजूबाजूला तपासणी करून डासोत्पत्ती ठिकाणे नष्ट करावीत. औषध फवारणी करावी. पालिका प्रशासन सुस्त असल्याचे दिसत आहे, असे सामाजिक कार्यकर्ते इकलास सय्यद यांनी सांगितले.

### पाणी साचू देऊ नका

» हा आजार डास चावल्याने होतो. यामुळे आपले घर व नजीकच्या परिसरात डासांची उत्पत्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी. याकामी घरात व आजुबाजुच्या परिसरात पाणी साचून राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. घरातील कचर्याची व टाकाऊ वस्तूंची योग्य विल्हेवाट लावावी. आपल्याला डास चावणार नाहीत याची वैयक्तिक खबरदारी घ्यावी, असे आवाहन महापालिकेने नागरिकांना केले आहे.

### रुग्णांची प्रकृती स्थिर

» विवेकनगर येथील एकाच घरातील तिघांना डेंग्यूची लागण झाल्याने त्यांना खासगी रूग्णालयात दाखल केले आहे. ते रुग्ण सद्यस्थितीत डेंग्यू संशयित आहेत. त्यांची प्रकृती स्थिर आहे. रुग्णांचा चाचणीचा अहवाल अद्याप प्राप्त नाही. वैद्यकीय विभागामार्फत त्या परिसरात सर्वेक्षण करण्यात आले. सोसायटीच्या शेजारील बांधकाम साईट येथे डेंग्यू आजारास कारणीभूत असलेल्या डासांच्या अळया आढळून आल्या आहेत. या ठिकाणी औषध फवारणी करुन डासांची उत्पत्ती स्थाने नष्ट केली आहेत. बांधकाम साईटकडून 10 हजारांचा दंड वसूल करण्यात आला आहे, असे दावा पालिकेने केला आहे.


# पुण्यातील वाहतूक कोडींवर उपाय सापडला, गुगलसोबत करार, 1 ऑगस्टपासून ही योजना राबवणार

## रस्त्याबाबत काम करणाऱ्या इतर स्थानिक प्राधिकरणांचे मदतीने विशेष उपाययोजना करण्याचा प्रोजेक्ट सुरु करण्यात येणार

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरातील रस्त्यांचे उपयोगानुसार वर्गीकरण करण्यात येणार आहे. त्यावर रस्त्याबाबत काम करणाऱ्या इतर स्थानिक प्राधिकरणांचे मदतीने विशेष उपाययोजना करण्याचा प्रोजेक्ट सुरु करण्यात येणार आहे. त्यानुसार जास्तीत जास्तीत वाहतूक असणारे शहरातील रस्त्यांमध्ये लक्षणीय बदल करण्यात येणार आहेत.

पुणे शहरातील नागरिकांचे वाहतूक कोंडीतून पुणेकरांची लवकरच सुटका होणार आहे. पुण्यातील वाहतूक कोडीं कमी करणे आणि वाहतुकीचा वेळ कमी करण्यासाठी शहरातील वाहतूक प्रमुख ३२ रस्त्यांवर साधरणा करण्यात येणार आहे. या रस्त्यांवर चौक सुधारणा, पार्किंग मॅनेजमेंट, वाहतूक नियंत्रण साधने, वाहतूक विलगीकरण टेक्नीक्स इत्यादी माध्यमातून अभिनव योजना राबवण्यात येणार आहे. यासाठी गुगलबरोबर करार करण्यात येणार आहेत. वाहतूक शाखा व पुणे महानगरपालिका यांच्या समन्वयातून एक ॲप्लीकेशन तयार करण्यात येणार आहे. यामुळे पुणे शहरातील रस्त्यांची कॅरींग कॅपेसिटी (जास्त वाहने जाण्याची क्षमता) वाढवण्यात येणार आहे.



### रस्त्यांवर वाहनांचा एकसारखा वेग हवा

» पुणे शहरातील या मुख्य रस्त्यांना प्राधान्यक्रम देवून त्याची क्षमता वाढवण्यात येणार आहे. यामुळे वाहन चालकांचा मुख्य रस्त्यांवरुन जाण्याचा कल वाढेल. परिणामी रहिवाशी रस्ते, व्यापारी रस्ते यावरील ताण कमी होईल. मुख्य रस्त्यावरुन वाहनांना एका सरासरी वेगाने जाता आले तर त्या रस्त्याची कॅरींग कपॅसिटी वाढते. म्हणजे वाहनांची संख्या वाढेल आणि जर सरासरी वेगापेक्षा कमी किंवा जास्त वेगाने वाहने गेली तर रस्त्यावर जाणाऱ्या वाहनांची संख्या घटते, हा फॉर्म्युला लक्षात घेऊन उपाय करण्यात येणार आहे.

### काय होणार सुधारणा

» रस्त्यावरील वाहतुकीचा वेग वाढवण्यासाठी या रस्त्यावर चौक सुधारणा होणार आहे. या ठिकाणी अद्ययावत सिग्नल यंत्रणा, पार्किंग मॅनेजमेंट, स्पिड ब्रेकर्स, रस्त्याची सरफेसींग, रस्त्यावरील अतिक्रमण काढणे, रस्त्यावर वाहतूक नियंत्रणाची साधने बसवणे, रस्त्यामधील मिसींग लिंक्स पूर्ण करणे, रस्त्यावरील वॉटर लॉगिंग पॉईंटस दुरुस्त करणे, या रस्त्यांवर नो हॉकर्स झोन करणे त्याची अंमलबजावणी करणे, रस्त्याबाबतच्या प्रलंबित कोर्ट केसबाबत पाठपुरावा करणे, रस्त्यांवरील अडथळा आणणाऱ्या झाडांबाबत उचित उपाययोजना करणे, अडथळा करणाऱ्या आस्थापनांवर कारवाई करणे तसेच या रस्त्यांवर वाहतूक विलगीकरण टेक्नीक्सचा वापर करणे असे सर्व कामे केली जाणार आहे.

# पीएमपीएमएलने झटकली अपघातांची जबाबदारी!

## वर्षभरात 'पीएमपी' बसचे 142 अपघात : 38 मृत्यूची नोंद, प्रशासन म्हणते, अपघात झालेल्या बस ठेकेदारांच्या!




**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपीएमएल) अपघातात गेल्या काही महिन्यांत सातत्याने वाढ होत आहे. परिणामी, रस्त्यांवरती वाहतूक कोंडीबरोबरच प्रवाशांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. दिवसाकाठी पीएमपी बसचे सरासरी किरकोळ आणि मोठे अशा स्वरूपाचे दहा ते बारा अपघात हमखास होत असल्याची नोंद अपघात विभागात होत असते. या अपघातानंतर पुन्हा एकदा बसचालकांचा निष्काळजीपणा समोर आला आहे. गेल्या सव्वा वर्षात पीएमपी बसचे एकूण १४२ अपघात झाले असून, यात ३८ जणांचा मृत्यू झाला. तर १११ जण जखमी झाले आहेत. यातील बहुतांश अपघात हे ठेकेदारांनी पुरवलेल्या बसचे असल्याचे पीएमपीकडून सांगण्यात आले आहे.

पिंपरी-चिंचवड, पुणे महापालिका आणि पीएमआरडीए हद्दीत ३८० मार्गांवर दररोज १६५० ते १७०० बसमार्फत सेवा दिली जाते. अनेक वेळा पीएमपी बसला अपघाताच्या घटना घडतात; पण गेल्या काही दिवसांमध्ये पीएमपी बस अपघातांमध्ये वाढ झाली आहे. विशेष म्हणजे पीएमआरडीएच्या हद्दीतील ग्रामीण भागात बस बंद पडण्याचे प्रकार नित्याचे झाले आहेत. याबाबत प्रवाशांनी अनेकदा तक्रारीही केलेल्या आहेत. मात्र, त्यावरती कोणतीही कार्यवाही झाली नाही. नादुरुस्त आणि वयोमर्यादा संपलेल्या बस या भागात सोडत असल्याचा आरोपही प्रवाशांनी केलेला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात चार मार्गांवर बीआरटी सुरू आहे. रस्त्याप्रमाणेच बीआरटी मार्गातही अपघात होत आहेत. या मार्गात अपघात झाल्यास संपूर्ण मार्गच अनेकदा बंद करावा लागतो. परिणामी, त्याचा तोटा प्रवाशांना बसत असून, पीएमपी बसचे वेळापत्रकही बिघडते. शहरभरात रस्त्यातच बस बंद पडल्याने प्रवाशांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जाते. बस बंद पडल्याने त्यांना वेळेत पोहोचण्यासाठी खासगी वाहन किंवा रिक्षा करावी लागते. त्यामुळे त्यांना तिकीट काढूनही भुर्दंड सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी प्रवासी करत आहेत.

दरम्यान पीएमपी बसचे एप्रिल २०२३ ते जून २०२४ दरम्यान एकूण १४२ अपघात झाले आहेत. यात ३८ जणांचा मृत्यू झाला. तर १११ जण जखमी झाले. चालकांकडून वाहतूक नियमांचे उल्लंघन होत आहे. पीएमपीचे चालक सिग्नल जम्पिंग, भरधाव वेगाने बस चालवणे, झेब्रा क्रॉसिंगवर बस थांबवणे अशा विविध वाहतूक नियमांचे उल्लंघन करताना दिसून येतात. पण, सर्वसामान्य वाहनचालकांवर वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी जो कारवाईचा दंडुका उगारला जातो. तो मात्र पीएमपी चालकांवर उगारल्याचे दिसून येत नाही. सन २०२२ मध्ये १३३, २०२३ मध्ये ११९ आणि सन २०२४ चे जून अखेरीस २३ अपघात झाले असल्याची नोंद आहे.

> पीएमपीएमएल वाहक, चालक तसेच खासगी कर्मचाऱ्यांना देखील प्रशिक्षण दिले जाते. रस्त्यावरती बस चालवताना कोणती काळजी घ्यावी, प्रवाशाची सुरक्षितता कशी महत्त्वाची आहे हे त्यातून प्रामुख्याने सांगितले जाते. त्याचप्रमाणे आरोग्य चाचणी आणि डोळ्यांची चाचणी देखील प्रत्येक डेपोत करण्यात येते. आरटीओचे अधिकारी हे देखील वाहकांना मार्गदर्शन करत असतात. अपघात टाळण्यासाठी शिबिरे राबवण्यात येत आहेत.
>
> **- सतीश गाटे, जनसंपर्क अधिकारी, पीएमपीएमएल.**

# पिंपरी चिंचवड इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन कडून महावितरण संचालकांची भेट...

## सर्वसामान्य ग्राहकांच्या सगळ्या समस्या सोडविण्याचे महावितरणच्या मुख्य व्यवस्थापकीय संचालकांचे आश्वासन



**पिंपरी | प्रतिनिधी**

महावितरणच्या समस्यांबाबत चर्चा करण्यासाठी मुख्य व्यवस्थापकीय संचालकांनी पिंपरी चिंचवड इलेक्ट्रिकल असोसिएशन ला पाचारण केले होते.त्यानुसार संघटनेच्या पदाधिकारी आणि सदस्यांनी मुंबईत जाऊन महावितरणचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक आदरणीय लोकेश चंद्र यांची भेट घेऊन विभिन्न विषयांबाबत चर्चा केली.यावेळी सगळ्या समस्या सोडविण्याचे आश्वासन मुख्य व्यवस्थापकीय संचालकांनी दिले आहे,त्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांच्या समस्या वेळेत सोडविण्यासाठी मदत होणार आहे.

पुणे जिल्ह्यात वेगवेगळे नियम लावत ग्राहक आणि ठेकेदारांना वेठिला धरले जात असल्याची बाब यावेळी निदर्शनास आणून दिली. सर्वसमान नियम लावण्याबाबत सूचना देण्याचे आश्वासन यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिले. महावितरणचा ऑनलाईन पोर्टल हा नाममात्र असून आजही सगळी कागदपत्रे जमा करण्याची सक्ती कार्यालयांकडून केली जात असल्याचे सदस्यांनी नमूद केले,त्यानुसार 100% ऑनलाईनबाबत निर्देश देण्याचे यावेळी अधिकाऱ्यांनी मान्य केले. ट्रान्सफॉर्मर लोडबाबत चुकीचे नियम लाऊन ग्राहकांना त्रस्त केले जात असल्याचा पाढा सदस्यांनी मांडला,त्यानुसार आय टी लोड नुसार नवीन जोडण्या देण्याची पद्धत चुकीची असल्याने त्याऐवजी पूर्वीप्रमाणे असलेली ट्रान्सफॉर्मर मीटर लोड नोंदीनुसार करणेबाबत सूचना देण्याचे अधिकाऱ्यांनी मान्य केले.

महावितरण मध्ये चुकीची कामे करत असलेल्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्या बदल्यांचे लॉक मुख्य कार्यालयाने काढून स्थानिक कार्यालयांना वर्षभरात कधीही तक्रार प्राप्त झाल्यावर बदली करण्याची मुभा द्यावी असे असोसिएशन चे म्हणणे होते. त्यानुसार तक्रार असलेले कर्मचारी आणि अधिकारी असतील तर तसा प्रस्ताव आल्यास तातडीने बदल्या करण्यासाठी मंजुरी देण्यात येईल असे महावितरण अधिकाऱ्यांनी सांगितले.मूळ कामाव्यतिरिक्त अतिरिक्त पायाभूत कामे सांगून ठेकेदार आणि ग्राहक यांना त्रस्त करत असलेल्या अधिकाऱ्याबाबत कारवाई करणेसाठी सूचना देण्याचे यावेळी मान्य केले.तसेच प्रादेशिक संचालक कार्यालयाने चुकीचे नियम लाऊन जो गैरकारभार सुरू केला आहे,त्याबाबत येत्या काही दिवसांत कारवाई होईल असे आश्वासन यावेळी अधिकाऱ्यांनी दिले.

या बैठकीला संघटना अध्यक्ष गिरीश बक्षी,कार्याध्यक्ष संतोष सौंदणकर,उपाध्यक्ष मनोज हरपळे, जावेद मुजावर,सचिव नितीन बोंडे, मंगेश सोनकांबळे,दिलीप कदम,मनोज सचदेव,संजय मोरे,सूरज भराटे,नटराज बोबडे,प्रदीप पाटील हे उपस्थित होते. महावितरण कडून संचालक,संचलन आणि सुव्यवस्था अरविंद भादिकर,मुख्य अभियंते प्रवीण परदेशी, दत्तात्रय पडळकर,मनीष वाठ, अविनाश हावरे, दिलीप शेट्टी आदी उपस्थित होते.

बैठक खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली आणि बैठकीला वेळ दिल्याबद्दल संघटनेने महावितरणचे आभार मानले.

### चुकीचे नियम लाऊन ग्राहकांना त्रस्त

» महावितरणचा ऑनलाईन पोर्टल हा नाममात्र असून आजही सगळी कागदपत्रे जमा करण्याची सक्ती कार्यालयांकडून केली जात असल्याचे सदस्यांनी नमूद केले,त्यानुसार 100% ऑनलाईनबाबत निर्देश देण्याचे यावेळी अधिकाऱ्यांनी मान्य केले.ट्रान्सफॉर्मर लोडबाबत चुकीचे नियम लाऊन ग्राहकांना त्रस्त केले जात असल्याचा पाढा सदस्यांनी मांडला,त्यानुसार आय टी लोड नुसार नवीन जोडण्या देण्याची पद्धत चुकीची असल्याने त्याऐवजी पूर्वीप्रमाणे असलेली ट्रान्सफॉर्मर मीटर लोड नोंदीनुसार करणेबाबत सूचना देण्याचे अधिकाऱ्यांनी मान्य केले.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा कोर्सेस बंद करण्याचा धडाका!

## यूजीसीने प्राध्यापक भरतीच्या दिल्या सहावेळा सूचना : विद्यापीठाचा कमी विद्यार्थी संख्येचे कोर्स बंद करण्याचा कार्यक्रम

**पुणे | प्रतिनिधी**

एकीकडे विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) देशातील विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, महाविद्यालयांना प्राध्यापक भरतीचे आदेश दिले आहेत. २०१९ ते २०२१ दरम्यान अशाप्रकारच्या पाच वेळा सूचना दिल्या होत्या. त्यानंतर आता नव्याने सूचना दिल्या असून, प्राध्यापक भरती प्रक्रियेची माहिती ३१ जुलैपर्यंत पाठवण्यास सांगितले आहे. दुसरीकडे सर्व संलग्न महाविद्यालयांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ प्रोग्रेसिव्ह क्लोजर अंतर्गत विविध रीसर्च अभ्यासक्रम, डिग्री कोर्सेस, पीएचडी रीसर्च सेंटर आणि महाविद्यालये बंद करण्याची ऑनलाईन प्रक्रिया सुरू केली आहे. येत्या १ ऑगस्टपर्यंत हे ऑनलाइन प्रस्ताव मागविले आहेत. यामुळे हजारो विद्यार्थ्यांची शिक्षणाची संधी तर संपुष्टात येणार आहे. त्याचबरोबर अर्ध वेळ, पूर्ण वेळ, तासिका आधारावरील कार्यरत शेकडो प्राध्यापक बेरोजगार होण्याची शक्यता आहे.

प्राध्यापक भरतीचे परिपत्रक यूजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी यांनी काढले आहे. विद्यापीठे, महाविद्यालये, उच्च शिक्षण संस्थांतील प्राध्यापकांच्या जागा रिक्त राहिल्याने त्याचा अध्ययन-अध्यापन प्रक्रियेवर परिणाम होतो. शिक्षण संस्थांमधील प्राध्यापक टंचाई हा चिंताजनक विषय असल्याचे नमूद करून 'यूजीसी'ने हस्तक्षेप करून प्राध्यापक भरती करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, अद्यापही भरतीप्रक्रिया पूर्ण झालेली नाही. त्यामुळे आता पुन्हा एकदा प्राध्यापक भरती करण्याचे स्मरण यूजीसीने करून



दिले आहे. तसेच त्याची माहिती सादर करण्याचे निर्देशही दिले आहेत. राज्यातही विद्यापीठे, महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. अलीकडेच राज्य शासनाने मान्यता दिलेल्या २०८८ पदांवर प्राध्यापक भरती प्रक्रिया राबवण्यात आली. त्याशिवाय विद्यापीठांतील रिक्त जागा भरण्यासही मंजुरी देण्यात आली आहे. त्याबाबतची प्रक्रिया सुरू आहे.

तासिका पद्धतीने कार्यरत असलेल्या प्राध्यापक सीमा पाटील (नाव बदलले आहे) म्हणाल्या, एकीकडे यूजीसी प्राध्यापक टंचाई असल्याची चिंता व्यक्त करत भरती प्रक्रिया करण्यासाठी सहा वेळा निर्देश देत आहेत. दुसरीकडे प्रोग्रेसिव्ह क्लोजर प्रक्रियेअंतर्गत व्यवस्थापनाला न आवडणाऱ्या प्राध्यापकांना घरी बसविण्याचे षडयंत्र राबवत आहे. ज्या प्राध्यापकांना नोकरीवरून काढायचे आहे, त्यांच्या विषयांना विद्यार्थी आले तरी प्रवेश नाकारला जातो. त्यानंतर विद्यार्थीसंख्येअभावी डिग्री कोर्स, पीएचडी रीसर्च सेंटर बंद करण्याचे धक्कादायक प्रकार घडत आहेत. त्यामुळे यूजीसी आणि विद्यापीठ प्रशासनाकडून काढण्यात आलेल्या परिपत्रकांमध्ये प्रचंड विरोधाभास आहे. शिक्षणाचे खासगीकरण झाल्यास त्याचे दूरगामी परिणाम होतील.

महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी अँण्ड कॉलेज टीचर्स ऑर्गनायजेशन (एमफुक्टो) चे प्रदेश अध्यक्ष डॉ. एस. पी. लवांडे म्हणाले, दरवर्षीप्रमाणे यूजीसीकडून प्राध्यापक भरती प्रक्रियेची आठवण करून देणारे परिपत्रक प्रसिद्ध केले जाते. परंतु विद्यापीठे आणि त्यांच्याशी संलग्न अनुदानित महाविद्यालयांमध्ये जवळपास १८,०० प्राध्यापकांची पदे रिक्त आहेत. यूजीसीच्या भरती नियमावलीनुसार ९० टक्के नियमित प्राध्यापक भरती, तर १० टक्के प्राध्यापक कंत्राटी पद्धतीवर भरणे अपेक्षित आहे. कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या प्राध्यापकांना पूर्ण वेळ प्राध्यापकांना मिळते तितके वेतन देण्याचे बंधन आहे. परंतु, वस्तुस्थिती भयानक आहे. राज्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये जवळपास ५० टक्के प्राध्यापकांची पदे रिक्त आहेत. नवीन पायंडा सुरू झाला आहे, एका पदावर दोन प्राध्यापक अशा प्रमाणात कंत्राटी पद्धतीने मेगाभरती सुरू आहे. गुणवत्ता असलेल्या प्राध्यापकांना नाईलाजास्तव कंत्राटी पद्धतीने तुटपुंज्या वेतनावर काम करावे लागते. त्यामुळे राज्य सरकारविरोधात भरती बंदी हटविण्यासाठी आम्ही आंदोलन करणार आहोत.

# खराडीच्या पंतप्रधान आवास योजनेत 70 टक्के भाडेकरू!

## सामान्य नागरिकांच्या घराच्या स्वप्नाला लागतोय सुरुंग : पालिका अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने घरमालक निवांत

**पुणे | प्रतिनिधी**

सर्वसामान्यांचे घराचे स्वप्न पूर्ण व्हावे, यासाठी पंतप्रधान आवास योजनेतून अल्पदरात घरे उपलब्ध करून दिली जातात. ही योजना शहरात स्वतःचे घर नाही, अशा नागरिकांसाठी पालिकेकडून राबिवण्यात येते. मात्र पालिकेच्या अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने खराडीतील प्रधानमंत्री आवास योजनेतील घरांत मालकांनी भाडेकरू ठेवले असून दोन्ही सोसायट्यांचा विचार केला तर जवळजवळ ७० टक्के भाडेकरू येथे राहत असल्याची धक्कादायक माहिती मिळाली आहे. त्यामुळे प्रकल्पात राहात असलेल्या भाडेकरूंची माहिती तपासण्याची मागणी होत आहे.



सर्वसामान्यांचे घराचे स्वप्न आजच्या महागाईच्या काळात सहज शक्य होत नाही. असे असले तरी आर्थिक दुर्बल घटकांसाठी सरकारकडून त्यांच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी पुढाकार घेतला जात आहे. अशा व्यक्तींना नियम, अटींच्या अधिन योजनेतून घर मिळते. ही योजना सरकारी असल्याने योजनेतील घर ज्या व्यक्तीच्या नावावर आहे, त्याने तसेच त्याच्या कुटुंबीयांनी राहणे अपेक्षित आहे. मात्र खराडीत खुद्द घरमालकांनीच भाडेकरू ठेवले असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे खरेच घर नसलेल्या व्यक्तींना घर मिळाले आहे की, कोणाच्या आशीर्वादाने घर योजनेत घेतले आहे, असा गंभीर प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जाऊ लागला आहे.

खराडी हा परिसर आयटी पार्क असल्याने या भागातील जमिनीचे भाव गगनाला भिडले आहेत. तसेच सदनिकेचे दर हे कोट्यवधींच्या घरात आहेत. त्यामुळे या भागात सर्वसामान्य व्यक्तीला घर खरेदी करणे आवाक्याबाहेर आहे. त्यामुळेच पंतप्रधान आवास योजनेला या भागात चांगला प्रतिसाद मिळाला. यातील खराडी येथील प्रकल्पाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण झाले.

ज्यांचे शहरात स्वतःचे घर नाही, अशा कुटुंबांना परवडणाऱ्या किमतीमध्ये घर उपलब्ध करून देणे, हा पीएम आवास योजनेचा मूळ उद्देश आहे. योजनेचा अर्ज भरताना स्वतःच्या नावावर घर नाही, मिळालेले घर भाड्याने देणार नाही, असे प्रतिज्ञापत्र द्यावे लागते. असे असतानाही खराडीतील प्रकल्पातील अनेक सदनिका लाभार्थ्यांनी भाड्याने दिली आहेत. ज्यांना घर मिळाले आहे, ते स्वत: या घरात राहात नसून भाडेकरूंना ठेवल्याने ज्यांना घराची गरज होती ते लाभापासून वंचित राहिलेत का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत महापालिकेने शहरात ८ हजारांहून अधिक सदनिका निर्माण करण्याचे नियोजन केले आहे. या योजनेतून महापालिका हद्दीत ज्यांचे घर नाही, अशा नागरिकांना परवडणाऱ्या किमतीत हक्काचे घर देण्यासाठी महापालिकेने हडपसर, खराडी आणि वडगाव खुर्द येथे एकूण २६५८ सदनिका निर्माण केल्या आहेत.

### भाडेकरू सापडले, कारवाई नाही

**» वडगाव शेरी आणि खराडीत पीएम आवास योजनेत घरमालकांनी भाडेकरूंना ठेवल्याची माहिती समोर आली होती. पाच भाडेकरू राहात असल्याचे आढळून आले होते. मात्र त्यानंतर पालिकेच्या अधिकाऱ्यांनी कारवाई केली जाईल, असे जाहीर केले होते. मात्र त्यानंतर कोणतीही कारवाई झाली नाही. या सदनिका भाड्याने देणाऱ्या लाभार्थ्यांना साधी नोटीस बजावण्याचे कष्टही अधिकाऱ्यांनी घेतले नव्हते. खराडीत अद्याप काहीच कारवाई करण्यात आलेली नाही.**

### प्रधानमंत्री आवास योजनेची स्थिती

**» एकूण घरांची निर्मिती - २ हजार ६५८**
**» वडगाव खुर्द प्रकल्पात घरे एकूण - १ हजार १०८ (शिल्लक - १६९, प्रतीक्षा - ३०९)**
**» हडपसरमधील तीन प्रकल्प - एकूण - ७६४ (शिल्लक- १७५, प्रतीक्षा- २४२)**
**» खराडी प्रकल्प - एकूण- ७८६**